REGISTERED No. B. 3434




# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें. बुधवार तारीख ३ डिसेंबर १९४७ अंक ४७

## बँक ऑफ पूना लि.

शेड्यूल्ड बँकः—रविवार पेठ, पुणें.




तुमच्या मौल्यवान वस्तू
थोडक्या खर्चांत सुरक्षित ठेवा.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

गो. गं. साठे, मॅनेजर.

## दि न्यू पूना एज्युकेशन सोसायटी

६०९ शनिवार पेठ, पुणें २.

मुदतीच्या ठेवी घेणें आहेत.

व्याजाचे दर व नियम याकरितां वरील पत्त्यावर आजच लिहा.

( पॅरॅमाउंट लि. ) कार्यवाह.

## दि ट्रिनिटी मेटल वर्क्स लि. मुंबई

पत्र्याचे लहान–मोठे डबे तयार करणारी कंपनी

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल रु. ५ लक्ष
खपलेलें भांडवल रु. ३,७३,८००
जमा झालेलें भांडवल रु. ३६७,८००

★ संचालक मंडळ ★

१ दि. ब. मोतीलाल बालमुकुंद मुथा (अध्यक्ष), सातारा
२ श्री. शि. शं. सक्री, ( उपाध्यक्ष ), बागलकोट
३ श्री. मा. ग. देसाई ( कार्याध्यक्ष ), मुंबई
४ श्री. ए. बी. पाटील, कोल्हापूर
५ शेठ अबीदिन एस्. तय्यबजी, मुंबई
६ श्री. जी. एस. वैद्य, पुणें
७ श्री. त्र्यं. य. फडके, मुंबई
८ शेठ रामनाथ एस्. सोमाणी, पुणें
९ दि. ब. उसुफ अली अब्दुल्ला साहेब, इस्लामपूर
१० श्री. व. न. म्हैसूर, पुणें ( पदसिद्ध )
११ श्री. स. धों. चव्हाण, मुंबई ( ,, )
१२ श्री. ल. बा. कोकणे, मुंबई ( ,, )

कंपनीचा स्टॅच्यूटरी रिपोर्ट नुकताच बाहेर पडला आहे. ३ वर्षें मुदतीच्या १ लक्ष रुपयांच्या ठेवी घेण्यासाठी संचालक मंडळानें परवानगी दिली आहे. दराबद्दल व नियमाबद्दल खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व. न. म्हैसूर,
मॅनेजर, सुप्रीम म्युच्युअल ॲशुअरन्स कं. लि.
८६६, सदाशिव, पुणें २

अथवा

कोकणे, म्हैसूर आणि कं.
मॅनेजिंग एजंट्स,
ट्रिनिटी मेटल वर्क्स लि.,
३६२ ए, विठ्ठलभाई पटेल रोड, मुंबई ४.

## विविध माहिती

**मि. एस. एन. लाठोरे**—ता. २२।१०।४७ च्या "अर्था"त मोमीन विव्हर्स को. सो. च्या अहवालासंबंधी माहिती आली आहे त्यांत मि. एस. एन. कोठारे असें मॅनेजरचें नांव चुकून पडलेलें आहे. तें मि. एस. एन. लाठोरे असें पाहिजे.

**मध्यवर्ती सरकारचे पाकिस्तान हद्दींतील नोकर**—मध्यवर्ती सरकारच्या पाकिस्तान हद्दींतील १,३९,७०३ नोकरांनीं हिंदी सरकारच्या हद्दींत येण्याची इच्छा व्यक्त केली होती, त्यांपैकीं १,१९,२२३ नोकरांची बदली आतांपर्यंत झाली आहे.

**इंग्रज अधिकाऱ्यांची निवृत्ती**—हिंदी स्वातंत्र्यामुळें २५४ युरोपियन आय. सी. एस. सनदी नोकरांनीं सेवानिवृत्ती पत्करली. इंडियन पोलिस खात्यांतील १९२ युरोपियन अधिकाऱ्यांनींहि तोच मार्ग पत्करला. इंडियन पोलिटिकल खातें व इंडियन मेडिकल खातें ह्यांतील अनुक्रमें ११ व १०० इंग्रज अधिकारी ह्याच प्रकारें गेले.

**हिंदी कागद गिरण्यांच्या उत्पादनांत घट**—हिंदी कागद-गिरण्यांच्या उत्पादनांत गेल्या दोन वर्षांत घट झाली त्याचें प्रमुख कारण मजुरांचें अडवणुकीचें धोरण होय, असें इंडियन पेपर मिल्स असोसिएशनचे मावळते अध्यक्ष श्री. शांति प्रसाद जैन ह्यांनीं सांगितलें. युद्धकाळांत उत्पादन ५३ हजार टनांपासून १ लक्ष, ७ हजार टनांपर्यंत वाढलें, परंतु १९४५-४६ मध्यें व १९४६-४७ मध्यें तें अनुक्रमें ९६ हजार टन व ८७ हजार टन एवढेंच झालें. गिरण्यांची उत्पादन शक्ती वाढावी ह्या दृष्टीनें त्यांना आकर्षक रहाण्याजोग्या कागदाच्या किंमती ठरवून घाव्या, ह्या मागणीचा सरकारनें कांहींच विचार केला नाहीं; सरकारनें कागदाच्या धंद्यावरील नियंत्रणें उठवावीं, असेंहि श्री. जैन म्हणाले.

**एथिओपिआकडे २८ हिंदी शिक्षक रवाना**—एथिओपिआंतील शाळांतून शिक्षकांचें काम करण्यासाठी २८ शिक्षक विमानानें नुकतेच रवाना झाले. एथिओपिअन सरकारचे शिक्षण मंत्री, डॉ. टॉमसन, हे गेल्या ऑक्टोबरमध्यें हिंदी शिक्षकांचें सहकार्य मिळविण्यासाठी येथें आले होते आणि त्यांच्या प्रयत्नांवरूनच हे शिक्षक एथिओपिआस जात आहेत. शिक्षकांनीं तीन वर्षांचें करारपत्र लिहून दिलें आहे. मद्रास, कोचीन, त्रावणकोर व म्हैसूर येथील शिक्षकांचाच ह्या टोळींत मुख्यतः भरणा आहे.

**हिंदुस्थान-कॅनडा रेडिओ-फोन**—हिंदुस्थान-कॅनडा ह्यांचेमध्यें रेडिओ-फोनचें दळणवळण सुरू झालें आहे. सकाळीं १०-३० ते मध्यरात्रीपर्यंत केव्हांहि बोलता येतें. पहिल्या तीन मिनिटांचा आकार ५० रु. आहे.

**कलकत्ता येथील चेक्सबाबत भामटेगिरी**— साध्या टपालांतून चेक पाठवत जाऊं नका, अशी सूचना कलकत्ता येथील पोलिसांनीं तेथील नागरिकांना केली आहे. कारण, कित्येक भामटे हे चेक्स लांबवून आणि त्यावरील नांवें व रकमेचे आकडे बदलून वटवितात, असें दिसून आलें आहे. अशा रीतीनें सुमारें २ लक्ष रुपये त्यांनीं मिळवले आहेत, परंतु पांच भामटे त्यांच्या साहित्यासकट सांपडले आहेत.

**श्री. एन. डब्ल्यू. गुर्जर-किर्लोस्करवाडीचे** श्री. एन. डब्ल्यू. गुर्जर ह्यांची कलकत्त्याच्या इंडियन इलेक्ट्रिकल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनच्या अध्यक्षस्थानीं १९४७-४८ सालाकरितां निवडणूक झाली आहे. श्री. गुर्जर हे म्हैसूर-किर्लोस्कर लि. चे डायरेक्टर आहेत.

**सहकारी ऑनररी ऑर्गनायझर्स**—मुंबई सरकारनें सहकारी सोसायट्यांचे ६० जिल्हा ऑनररी ऑर्गनायझर्स नेमले आहेत, त्यांच्या नेमणुकीची मुदत ३० जून, १९४८ अखेर आहे.

**शेतकीस लागणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या कमाल किंमती**—आयात होणारे ट्रॅक्टर्स, ऑईल इंजिनें, वापलेले लोखंडी नळ, इत्यादींच्या कमाल किंमती मुंबई सरकारनें एक हुकूम काढून ठरवून दिल्या आहेत.

**चीनची लोकसंख्या**—चीनची लोकसंख्या आतां ४६ कोटींवर गेली आहे.

**जर्मन रुळांचें स्थलांतर**—रशियाव्याप्त जर्मन मुलुखांतून रशियानें जर्मनीचे ४,३७५ मैल लांबीचे रेल्वे रूळ नुकसान-भरपाई दाखल काढून नेले आहेत.

**हिंदुस्थानांतील मळ्यांवरील कामगार**—हिंदी मध्यवर्ती सरकार चहा, कॉफी, रबर इत्यादींच्या मळ्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या जीवनाचा विचार करण्याकरता जानेवारी किंवा फेब्रुआरी १९४८ मध्यें एक परिषद् भरविणार आहे. ह्या परिषदेंत मळ्यांवरील कामगारांचा किमान पगार, वैद्यकीय मदत, कामाचे तास व सुखसोयी या बाबींचा प्रामुख्यानें विचार करण्यांत येणार आहे.

**पाकिस्तानांतील कापसाचें पीक** — पाकिस्तानांत यंदा पिकलेल्या कापसाचा अंदाज १५ लाख गासड्या करण्यांत आला आहे., ह्या पिकाची किंमत जवळ जवळ ४५ कोटी रुपये होईल. पाकिस्तानांत पिकणाऱ्या, लांब धागा निघणाऱ्या कापसाला अमेरिका, इंग्लंड आणि चीन हीं मुख्यतः गिऱ्हाइकें असतात.

**इराणची पाकिस्तानला मदत** — पाकिस्तानच्या आरोग्य-मंत्र्यांच्या विनंतीला 'ओ' देऊन इराणच्या मुख्य प्रधानानें पाकिस्तानांतील निर्वासितांसाठी पैसे व गरम कपडे धाडण्याची सूचना इराणच्या नागरिकांना केली आहे.

**हॉलिवुडमधील नट व्याख्याते बनणार**—अन-अमेरिकन कमिटीनें हॉलिवुडमधील कम्युनिझमची सध्या चौकशी चालविली आहे. ह्या चौकशीचा निषेध करण्यासाठी हॉलिवुडमधील कांहीं नट, लेखक आणि डायरेक्टर वॉशिंग्टनला गेले होते. परत जातांना वाटेंत सहा शहरांत थांबून, विमान तळावर जमणाऱ्या लोकांना उद्देशून ते व्याख्यानें देणार आहेत. त्यांच्या मतें, कोणत्याहि सरकारला नागरिकांच्या राजकीय मतांची चौकशी करण्याचा हक्कच नाहीं.

**बटाट्यांच्या लागवडीसाठी मदत**—१९४७-४८ च्या रबीच्या हंगामांत गरीब शेतकऱ्यांनीं अधिकांत अधिक बटाट्याची लागवड करावी म्हणून मुंबई सरकारनें अहमदाबाद, खेडा, पुणें, सातारा, नगर, नाशिक, बेळगांव व धारवाड जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना तगाई कर्जें देण्यासाठी २५ लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. कर्जावर व्याज ३ टक्के घेण्यांत येणार असून शेतकऱ्यांनीं कर्जाचा उपयोग बटाट्याचें बियाणें, खत आणि पेंड ह्यांच्या खरेदीसाठी करावयाचा आहे. सरकारच्या शेतकी खात्याकडून वरील जिनसा पुरविण्यांत येणार आहेत.

**उसाच्या मळीपासून पॉवर अल्कोहल**—साखरेच्या कारखान्यांतून वाया जाणाऱ्या उसाच्या रसाच्या मळीपासून पॉवर अल्कोहलची निर्मिति वाढविण्याचा हिंदी सरकार विचार करीत आहे. संयुक्त प्रांत सरकारनें आपल्या प्रांतांतील साखरेच्या कारखान्यांवर पॉवर अल्कोहल तयार करण्याची सक्ती केली आहे. ह्याच उपायाचा अवलंब मध्यवर्ती सरकारहि करणार असल्याचें समजतें.

# अर्थ

बुधवार, ता. ३ डिसेंबर, १९४७




प्रो. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कंपनीच्या जिंदगींत कामगारांना हिस्सा मागता येतो काय ?

### औद्योगिक कलहासंबंधीं एक महत्त्वाचा निवाडा

कंपनी गुंडाळल्यानंतर तिची गुड वुइल, जिंदगी आणि रिझर्व्ह फंड ह्यांच्यामध्यें कामगारांना ५०% वाटा मिळावा, अशी बाँबे इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रॅम्वेज कं. लि. च्या कामगारांची मागणी होती, तिची न्याय्यता ठरविण्याचे काम इंडस्ट्रिअल कोर्टाचे अध्यक्ष, सर हरसिद्धभाई दिवेटिया, ह्यांच्याकडे सोपविलेलें होतें. ह्या मागणीप्रमाणेंच पगारवाढीच्या व भत्याच्या इतरहि कांहीं मागण्या कामगारांनीं केलेल्या होत्या, परंतु त्यांतील तत्त्वाच्या दृष्टीनें महत्त्वाची मागणी ५०% वाटणीचीच होती. ही रकम सध्याचे व पुढें येणारे कामगार ह्यांच्या हितासाठी एका ट्रस्टमध्यें ठेवण्यांत यावी अशी कामगारांची सूचना होती. बी. ई. एस. टी. कंपनीचें मूल्यमापन करून ती मुंबई कॉर्पोरेशननें विकत घेण्याचें ठरविलें व त्याप्रमाणें कंपनीची व्यवस्था कॉर्पोरेशनमार्फत चालू आहे, हें सुप्रसिद्धच आहे.

### " जिंदगीवर कामगारांचा हक्क नाहीं "

इंडस्ट्रिअल कोर्टाचे अध्यक्ष, सर हरसिद्धभाई दिवेटिया, ह्यांच्या निवाड्याप्रमाणें कामगारांना मालकांकडून गुडवुइल किंवा गंगाजळी ह्यांत हिस्सा मागण्याचा अधिकारच पोचत नाहीं; फक्त भागीदारांचाच तो अधिकार आहे. कामगारांना योग्य दर्जाच्या रहाणीस पुरेल एवढें वेतन मिळावें, हें सर्व सामान्य न्यायास धरून होईल आणि कोणत्याही उद्योगधंद्यानें तें वेतन अगोदर भागविलेंच पाहिजे. ज्या उद्योगधंद्यांची भरभराट होण्यास कामगारांनीं हातभार लावला, त्याच्या नफ्यांत त्यांना कांहीं अंश मिळणें वरील विचारसरणी प्रमाणें ओघानेच येतें. हा अंश वार्षिक बोनसच्या स्वरूपांत त्यांना दिला जातो. परंतु तो एकदा दिल्यावर कामगारांचा कंपनीच्या जिंदगीवर कोठलाही हक्क उरत नाहीं. वर सांगितलेला, सामान्य न्यायाचे आधारावरील नफ्यांतील वाटा हा कामगारांना उद्योगधंद्यांतील भागीदार म्हणून मिळत नसून, त्यांच्या मजुरींतून त्यांना असाधारण खर्चासाठी लागणाऱ्या रकमेची बचत करतां येत नाहीं ह्याकरिता स्वतः मालकानें आपली जबाबदारी ओळखून दिलेली ती रक्कम असते. आजचे कामगार माजी कामगारांचे वतीनें मागणी करूं शकत नाहींत व पुढें येणाऱ्या कामगारांसाठीहि आज ट्रस्ट करतां येणार नाहीं; कारण आजचे कामगार माजी किंवा आगामी कामगारांचे प्रतिनिधी होऊंच शकत नाहींत, असेंहि इंडस्टियल कोर्टाच्या अध्यक्षांनीं म्हटलें आहे.

### कानपूर कंपनीबाबत निवाड्यावर श्री. श्रॉफ ह्यांची टीका

कानपूर इलेक्ट्रिकल सप्लाय कॉर्पोरेशन लि. व तिचे कामगार ह्यांचेमध्यें अशाच प्रकारचा वांधा निर्माण झाला होता, हें वाचकांस स्मरत असेलच. त्या प्रकरणांत उत्पन्न झालेल्या तंट्यांत ॲडज्युडिकेटरनें दिलेल्या निर्णयाप्रमाणें, कंपनीचें राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर कंपनीच्या गंगाजळीपैकी निम्म्यावर कामगारांना मालकी हक्क देण्यांत आला आहे व प्रांतिक सरकारनें त्याची अंमलबजावणीही केली आहे. मुंबई शेअर बाजाराचे अध्यक्ष, श्री. श्रॉफ ह्यांनी त्यावर खालीलप्रमाणें मत व्यक्त केलें होतें:—

"मजूर वर्ग उत्पादनांत आवश्यक असला तरी त्याची भांडवलाबरोबर समता पूर्णांशानें अगर अल्पांशानेंही अजून मान्य केली गेलेली नाहीं. १९१६ सालापासून कानपूर कंपनींतील कामगारांना नियमितपणें बोनस वाटण्यांत आलें असलें तरी ती रूढी कंपनीला होणाऱ्या नफ्यापुरतीच मर्यादित आहे. नफा आणि गंगाजळी हे वेगळे असल्यानें गंगाजळीवर कामगारांचा हक्क उपस्थित होत नाहीं. निर्णय अमलांत आणला तर पैसे गुंतविणारांच्या मालकीच्या शिलकींतून ६५ लाख रुपये एका लहानशा वर्गाला अनपेक्षित दिल्यासारखें होईल. भागीदारांना अशा तऱ्हेनें नागविणेंच असेल, तर जनतेकडून तसा आदेश मिळाल्यानंतर कायदा करूनच नागवितां येईल. अशा तऱ्हेचा कायदा मंजूर झाला तर स्वतंत्र व लोकशाही समाजांतील आर्थिक जीवनाचा पायाच उखडला जाईल.

### " जरूर तर, कंपनी कायद्यांत दुरुस्ती करा "

कानपूरच्या वांध्यांतील पंचाचे मतें, कंपनीचे भागीदार व कामगार ह्यांचेमध्यें कंपनीचे सर्व नफे वाटून मिळण्याचा अप्रत्यक्ष करारच समजला पाहिजे, कारण कानपूर कंपनी ३० वर्षें बोनस देत आली आहे आणि हा बोनस डिव्हिडंडशी जोडलेला होता व रिझर्व्ह हे साचलेल्या नफ्यांतूनच निर्माण झालेले होते. सर हरिसिद्धभाईंचें मत ह्याचे अगदी विरुद्ध आहे. बोनसचा संबंध फक्त डिव्हिडंडच्या दरापुरताच होता; कंपनी गुंडाळण्याच्या वेळीं जिंदगीची वाटणी कशी व्हावी, ह्याच्याशी त्याचा कांहींही संबंध नाहीं. बोनस, पुनः कामावर घेणें, रोजगार गेल्याबद्दल नुकसानभरपाई, पगारी सुट्ट्या, आजारीपणाचा विमा, इत्यादि गोष्टी आहेत त्यांसाठी स्वतंत्र कायदा करून त्यांची अंमलबजावणी केली जाते. कंपनी गुंडाळल्यानंतर कामगारांना मालमत्तेंत हिस्सा मिळावा असें जनतेचें मत असल्यास, इंडियन कंपनीज ॲक्टांत दुरुस्ती करणें हाच योग्य मार्ग आहे. वेगवेगळ्या उद्योगधंद्यांबाबत स्वतंत्र पंचांनीं त्या संबंधांत निर्णय देणें अप्रस्तुत होईल. सर हरिसिद्धभाईंची ही विचारसरणी मालक वर्गासच नव्हे, तर बिगर-कामगार सामान्य जनतेलाहि पटण्याजोगी आहे.

शेअर बाजाराचे अध्यक्ष, श्री. श्रॉफ, ह्यांनीं कानपूर इ. स.कॉर्पोरेशनचे संबंधांतील कलहाचे निवाड्यावर जी टीका केली, तिचेशी मुंबई इंडस्ट्रिअल कोर्टाचे अध्यक्ष सहमत आहेत, असें त्यांच्या बी. ई. एस. टी. प्रकरणांतील निवाड्यावरून दिसून येईल. दोन प्रांतांतील पंचांचे दोन महत्वाचे निवाडे परस्पर विरुद्ध असल्यानें, मालक मजुरांतील जिंदगी-वाटणीबाबत कलहाचें मूळ नष्ट करण्याचा एकच मार्ग त्यांची कायदेशीर व्यवस्था लावणें हा होय, हें आतां स्पष्ट आहे.

## कापडाच्या किंमतींचा प्रश्न

हिंदुस्थान सरकारनें कापसाच्या कापडाच्या किंमतींचा प्रश्न टॅरिफ बोर्डाकडे सोपविण्याचें ठरविलें आहे. टॅरिफ बोर्ड कापडाच्या किंमती संबंधी एक, आणि त्याचें उत्पादन व वाटणी ह्या संबंधीं एक असे दोन अहवाल सरकारला सादर करणार आहे. टॅरिफ बोर्डाला चौकशीच्या ज्या मर्यादा घालून देण्यांत आल्या आहेत त्यांचा आशय पुढीलप्रमाणें आहे. किंमतींसंबंधी शिफारशी करतांना बोर्डानें दोन बाबींकडे अवधान द्यावयाचें आहे. एक तर देशांतील सर्व गिरण्यांतील उत्पादन जास्तीत जास्त उंच पातळीवर राहिलें पाहिजे. दुसरें असें कीं, शिफारसींमुळें जास्त कार्यक्षम असणाऱ्या गिरण्यांची नफ्याची मर्यादा भलतीच वाढता कामा नये. पण, बोर्डाला असें वाटण्यांचा संभव आहे कीं ह्या दोन्ही बाबींकडे लक्ष पुरवून व्यवहार्य सूचना करता येणें कठीण आहे. अशा परिस्थितींत ज्या गिरण्या कमी कार्यक्षम आहेत त्यांना आर्थिक मदत देऊन कापडाच्या किंमती योग्य त्या पातळीवर ठेवतां येतील कीं नाहीं ह्याचा विचार बोर्डानें करावयाचा आहे. फक्त सूत काढणाऱ्या गिरण्यांची कांहीं विशिष्ट परिस्थिती असेल तर बोर्डानें शिफारसी करतांना त्या परिस्थितीचा विचार करावा. निरनिराळ्या तऱ्हेचें कापड आणि सूत ह्यांची उत्पादनाची किंमत काय आहे ह्या बाबत चौकशी करून, खुद्द गिरणींत कापडाच्या व सुताच्या किंमती काय पडाव्या ह्याबद्दल बोर्डानें शिफारसी करावयाच्या आहेत. कच्चा कापूस आणि उत्पादनाच्या किंमती ठरविण्यांत विचार करावे लागणारे इतर घटक ह्यांच्या किंमतींत जे चढ–उतार होतील त्यांच्या अनुरोधानें गिरणींतील कापडाच्या किंमती कमी अधिक करण्याबद्दलही बोर्डानें सूचना करावयाच्या आहेत. एखाद्या गिरणीला अगर घटकाला आर्थिक मदत द्यावयाची सुचविल्यास त्यासाठी पैसा कसा उभारावा ह्याबद्दलहि बोर्डानें योजना सुचवावयाची आहे. बोर्डानें पहिला अहवाल तीन महिन्यांत करावयाचा आहे. तथापि कापडाच्या धंद्यासंबंधी सर्व साधारण विचार करणारा दुसरा एक अहवालही बोर्डानें मागाहून सादर करावयाचा आहे. ह्या दुसऱ्या अहवालांत उत्पादन वाढविण्यासाठी कामगारवर्गाचें सहकार्य कसें मिळवावें, नासधूस कशी टाळावी, सध्याची कापड नियंत्रणाची व वाटपाची पद्धत कशी आहे, ती पुढें चालू ठेवावी कीं नाहीं, इत्यादि प्रश्नांचा विचार बोर्डानें करावयाचा आहे.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना करणारें बिल सध्या मध्यवर्ती विधिमंडळांत चर्चिलें जात आहे. अशा तऱ्हेच्या संस्थेच्या स्थापनेचा विचार दीर्घ काळ चालू होता आणि तिच्या योजनेचा तपशीलहि प्रसिद्ध झाला होता. उद्योगधंद्यांना दीर्घकालीन भांडवल पुरविणें व्यापारी बँकांच्या कार्यक्षेत्रांत येत नाहीं; हें काम करण्यासाठी प्रस्तुत कॉर्पोरेशनची स्थापना होत आहे. इतर कित्येक देशांत अशा प्रकारच्या संस्था यशस्वी रीतीनें चालू आहेत.

नियोजित कॉर्पोरेशनचें भांडवल ५ कोटी रु. असून तें मध्यवर्ती सरकार, रिझर्व्ह बँक, शेड्यूल्ड बँका, विमा कंपन्या, इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स, इत्यादींना घेतां येईल. खासगी व्यक्तींना कॉर्पोरेशनचे शेअर्स धारण करतां येणार नाहींत. कॉर्पोरेशनच्या भांडवलाची हमी सरकार देणार असून त्यानें २½% व्याजाचीहि हमी देण्याचें ठरविलें आहे. २५ वर्षेपर्यंत मुदतींचीं कर्जे कॉर्पोरेशन देऊं शकेल.

## दि म्हैसूर किर्लोस्कर लि., हरिहर

### ६% डिव्हिडंडला मंजुरी

किर्लोस्कर बंधू लि. च्या मॅनेजिंग एजन्सीखालील वरील कंपनीस ३० जून १९४७ अखेर संपलेल्या वर्षी ६ लक्ष, २२ हजार रुपये ठोक नफा झाला, त्यांतून पगार, अलावन्स, प्रवासखर्च, व्याज, कर, मजुरांच्या सुखसोई, स्टोअर्सच्या किंमतींतील चढ-उतारासाठी व इनकमटॅक्ससाठी तरतूद, घसारा, इत्यादींची व्यवस्था केल्यावर निवळ नफा ६५,०११ रु. उरला. १० लक्ष रुपयांच्या वसूल भांडवलावर ६% दरानें डिव्हिडंड देण्यास ६० हजार रुपये लागले व ५ हजार रु. रिझर्व्ह फंडांत टाकण्यांत आले. म्हणजे तो फंड आतां ५० हजार रु. होईल. कंपनीचा घसारा फंड ७ लक्ष, ८८ हजार रु. झाला आहे. मशिनरी रिझर्व्ह फंड, स्टोअर्स प्राइस फ्लक्चुएशन फंड, इत्यादि फंडहि कंपनीनें निर्माण केले आहेत, त्यावरून मजबुती वाढविण्याच्या कंपनीच्या धोरणाची कल्पना येईल. एकूण ताळेबंद २९ लक्ष, ३६ हजार रुपयांचा आहे. कच्चा माल, विशेषतः पिग आयर्न व पोलाद, मिळण्यांतील अडचणींमुळें कमाल उत्पादन चालू ठेवण्याजोगी परिस्थिति नाहीं. मजूरविषयक अडचणींमुळेंहि येतें वर्ष उत्पादनास अनुकूल न रहाण्याचा संभव आहे. लोखंड–पोलादाचें उत्पादन सुमारे २५% घटल्यामुळें, त्यांपासून माल तयार करणाऱ्या कारखानदारांचा कोटा कमी होण्याचा संभव आहे. ह्या सर्व अडचणींतून मार्ग काढण्याचा कंपनीचा प्रयत्न अर्थातच चालू राहील. स्मॉल टूल्सच्या उत्पादनाच्या नियोजित खात्यासाठी यंत्रसामुग्री आली आहे ती बसविण्याचें काम चालू आहे. पोलादाच्या तुटवड्यामुळें ह्या कामाच्या प्रगतीस थोडा अडथळा आला आहे. कंपनीची वार्षिक सभा ता. १५ नोव्हेंबर रोजीं हरिहर येथें भरली होती, त्या वेळीं वरील अहवाल डायरेक्टर बोर्डानें भागीदारांस सादर केला.

## सावकार नियंत्रणाचा कायदा

मुंबई विधिमंडळानें मंजूर केलेला मुंबई सावकार नियंत्रणाचा कायदा ता. १७ नोव्हेंबरपासून अंमलात आला आहे. सावकारांची नोंद ठेवण्यासाठी रजिस्ट्रार ऑफ कोऑपरेटिव्ह सोसायटीज आणि डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चरल मार्केटिंग अँड रूरल फिनॅन्स ह्यांचीच रजिस्ट्रार जनरल म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील कलेक्टरला जिल्ह्यांतील सावकारांचा रजिस्ट्रार म्हणून नेमण्यांत आलें आहे. तथापि, मुंबई, अहमदाबाद, पुणें, सोलापूर, बेळगांव व हुबळी ह्या शहरांवर मात्र ह्या कायद्यापुरती कलेक्टरची हुकमत चालणार नसून त्यासाठी वेगळे रजिस्ट्रार्स नेमण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें, ठिकठिकाणच्या मामलेदारांना आणि महालकऱ्यांना आपआपल्या हद्दीपुरते असिस्टंट रजिस्ट्रार करण्यांत आलें आहे. मात्र, ह्या अधिकाऱ्यांच्या क्षेत्रांत मुंबई, अहमदाबाद, सुरत, पुणें, नाशिक, बेळगांव, हुबळी व मेवास भाग ह्यांचा समावेश होत नाहीं. ह्या शहरांसाठी वेगळ्या असिस्टंट रजिस्ट्रार्सची सोय करण्यांत आली आहे. प्रस्तुत कायद्याप्रमाणें जरूर असलेल्या परवान्यासाठी असिस्टंट रजिस्ट्रारकडे अर्ज करावयाचे आहेत. मुंबई येथील रजिस्ट्रार आणि असिस्टंट रजिस्ट्रार यांच्या कचेऱ्या, टौन हॉल बिल्डिंगच्या तळमजल्यावर ठेवण्यांत आल्या आहेत.

## दि बँक ऑफ कराड लि.

वरील बँकेस आणखी २½ लक्ष रुपयांचे भाग विक्रीस काढण्याची हिंदुस्थान सरकारनें परवानगी दिली आहे.

## हिंद सरकारचें अंदाजपत्रक

### अर्थमंत्र्यांचा आर्थिक आढावा

हिंद सरकारचे अर्थमंत्री श्री. षण्मुखम् चेट्टी ह्यांनीं पंधरा ऑगस्ट ते मार्च १९४८ अखेर पर्यंतच्या साडेसात महिन्यांचें अंदाजपत्रक मध्यवर्ती विधिमंडळाला ता. २६ रोजीं सादर केलें. जमाखर्च व तूट इ. बद्दलची परिस्थिति पुढील तक्त्यांत दाखविली आहेः—

| उत्पन्नाचा अंदाज | खर्चाचा अंदाज | अंदाजी तूट |
| --- | --- | --- |
| रु. | रु. | रु. |
| १७१ कोटी १५ लक्ष | १९७ कोटी ३९ लक्ष | २६ कोटी २४ लक्ष |

जमाखर्चांतील तूट, अगदीं अल्प बाबी पुरेशी म्हणजे रु. १ कोटी ६५ लक्ष एवढ्या रकमेची, कापड व सूत यांच्या निर्यातीवर शेंकडा तीन टके निर्यात जकाती ऐवजीं, कापडावर दर चौरस वारामागें चार आणे व सुतावर पौंडामागें सहा आणे याप्रमाणें निर्यात जकात बसवून भरून काढण्यांत येणार आहे. बाकी उरणारी रु. २४ कोटी ५९ लक्ष एवढी तूट कोणत्याहि करवाढीनें भरून काढली जाणार नाहीं, तर कर्ज काढून ही तूट भागविली जाईल असें दिसतें. फाळणी, निर्वासितांचा प्रश्न व व्याज आणि पेन्शनें या बाबतींतला पाकिस्तानचा अ ज हिंद सरकारला तात्पुरता सोसावा लागणारा वांटा ह्या अत्यंत असामान्य कारणांमुळें येणारी ही तूट, नेहमींच्याच मार्गांनीं म्हणजे करवाढीनें भागविली जाऊं नये असें स्पष्ट मत अर्थमंत्र्यांनीं व्यक्त केलें.

अंदाजपत्रक तुटीचें आहे, परंतु प्रत्यक्ष नागरिकांवर पडणारी कोणतीहि करवाढ नाहीं यामुळें सर्वांनाच एक प्रकारें समाधान वाटणें साहाजिक आहे. कापड व सूत यांच्या निर्यातीवरील वाढता कर हा परस्पर परदेशी खरेदीदारांवर पडणार आहे. फाळणीमुळें सरकारची आर्थिक जबाबदारी वाढली, परंतु नागरिकांवर करवाढ नाहीं ही स्तुत्य गोष्ट आहे. अंदाजपत्रकाकडे कारखानदार व व्यापारी वर्ग विशेष बारकाईनें पाहात असतो. त्याहि वर्गाचें अंदाजपत्रकानें नुसतें समाधानच झालेलें नाहीं, तर लियाकत-अलींच्या गेल्या मार्चमधील बजेटमुळें कारखानदार व व्यापारी वर्गाला जो जबरदस्त धक्का बसला होता तो दूर होऊन अर्थमंत्र्यांच्या सविस्तर भाषणामध्यें भरपूर आशा विश्वास निर्माण करणारीं अनेक विधानें वाचून ह्या वर्गाचा सरकारच्या धोरणावर पूर्णपणें विश्वास बसला आहे याचें प्रत्यक्ष गमक म्हणजे टाटा डिफर्डचा भाव ता. २६ रोजीं संध्याकाळींच रु. १०० नीं चढला, व श्री. श्रॉफ, रतिलाल गांधी, सर चुनिलाल मेहता इ. उद्योगपतींनीं व्यक्त केलेले विचार होय. कारखानदार व व्यापारी वर्गाच्या दृष्टीनें अर्थमंत्र्यांच्या भाषणांतील पुढील आशयाचीं विधानें अत्यंत महत्त्वाचीं आहेत. (१) गेल्या मार्चमध्यें उद्योगधंद्यावर जादा कर बसवून भांडवलाच्या गुंतवणुकीला जें विघातक वातावरण निर्माण झालें, व ज्या परिस्थितीकडे रिझर्व्ह बँकेच्या वार्षिक अहवालानेंहि लक्ष वेधविलें आहे, त्या परिस्थितीची पुढील अंदाजपत्रकापूर्वी पाहाणी करून कर योजनेंत योग्य ते फेरबदल करण्याचें आश्वासन. (२) राष्ट्रीकरणाचें संकट स्वातंत्र्य मिळतांच ओढवेल अशी भीति कारखानदारांना वाटत होती तर या बाबतींत खाजगी उद्योगधंद्यांना पुढें कित्येक वर्षें भरपूर अवसर देण्याचें सरकारचें निश्चित शब्दांत अश्वासन. हिंदला ज्यांत खाजगी भांडवल व साहस यांना भरपूर वाव असेल अशा 'संमिश्र आर्थिक धोरणावर' सरकारचा पूर्ण विश्वास. (३) अपुऱ्या उत्पादनाची बरीचशी जबाबदारी अर्थमंत्र्यांनीं गेल्या एक दोन वर्षांतील मजुरांच्या बेजबाबदार धोरणावर स्पष्टपणें लादली आहे. (४) सरकारनें स्वस्त दरानें पैसे कर्जाऊ घेण्याचें धोरण स्वीकारलें तरी कारखानदारांनाहि स्वस्त दरानेंच पैसे उद्योगधंद्यासाठी मिळूं शकतील असेंच कर्जाच्या बाबतींत धोरण स्वीकारण्याचें आश्वासन. (५) फाळणी झाली असली तरीहि एकंदरींत हिंद सरकारची आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे अशी ग्वाही. (६) सध्यांची तात्पुरती बिकट परिस्थिति आपोआप दूर होऊन १९४९-५० च्या अंदाजपत्रकांत सहज तोंडमिळवणी होऊं शकेल असा विश्वास.

याप्रमाणें अर्थमंत्र्यांचें भाषण बारकाईनें वाचलें असतां वर दाखविल्याप्रमाणें त्यांत कारखानदार व व्यापारी वर्गाला भरपूर आश्वासनें देणारीं, व एकंदर आर्थिक परिस्थिति समाधानकारक आहे असें दर्शविणारीं, व खाजगी भांडवलवाल्याच्या ठिकाणीं सरकारी धोरणाबद्दल विश्वास निर्माण करणारीं अनेक विधानें आढळतात. या सर्वांचा परिणाम असा होणार आहे कीं अंदाजपत्रकांत करवाढ नाहीं म्हणून सामान्य जनता खूष व भांडवलदारांना भरपूर आशास्थळें म्हणून तेहि अत्यंत आनंदित.

परंतु या सर्व परिस्थितीचा जास्त मार्मिकपणें विचार केला पाहिजे असें आम्हास सुचवावेसें वाटतें. बजेटामुळें हुरळून जाण्याचें कोणालाच कारण नाहीं. खुद्द अर्थमंत्र्यांनीं समाधानकारक आर्थिक परिस्थितीचें चित्र कुशलतेनें, भांडवलदार वर्गाला विश्वासांत घेऊन रेखाटण्याचा प्रयत्न केला असला तरी, विशेषतः १५ ऑगस्टनंतर निर्माण झालेल्या बिकट आर्थिक परिस्थितीची जाणीव त्यांच्याहि भाषणांत मधून मधून डोकावते व विचारवंताचें मन खिन्न केल्याशिवाय राहात नाहीं. उदाहरणार्थ, गेल्या साडेतीन वर्षांत अन्नधान्याच्या आयातीवर रु. १६९ कोटी खर्च करावे लागले असतां, लवकरच स्थिति सुधारेल या बोलण्यांत काय अर्थ? या आशावादामागें निश्चित योजना कितीशा आहेत? कापड, पोलाद व सिमेंट यांचें उत्पादन गेलीं दोन वर्षें घटत असतांना त्यांत वाढ किती व केव्हां होणार? खुद्द सरकारलाच चालू वर्षी अपेक्षेप्रमाणें रु. १५० कोटीचें कर्ज उभारणें अशक्य गेलें. असें असतांना स्वस्त दरानें कर्ज काढण्याच्या धोरणावर कितपत विश्वास ठेवणें योग्य होईल? रिझर्व्ह बँकेच्या सभेच्या अध्यक्षांनींहि या बाबतींत वार्षिक अध्यक्षीय भाषणांत इशारा दिला होता. युद्धोत्तर पुनर्घटनेच्या योजनेसाठी खर्चीं पडणाऱ्या रकमांना थोडासा काट द्यावा लागेल असेंहि अर्थमंत्र्यांच्या भाषणावरून दिसून येतें. याशिवाय फाळणीमुळें निर्माण झालेली परिस्थिति, निर्वासितांसाठी खर्च, पश्चिम बंगाल व पूर्व पंजाब ह्या प्रांतांना द्यावी लागणारी जादा मदत, लष्करासाठी होणारा मोठा खर्च, याबाबतींत खर्चाच्या रकमा अंदाजापेक्षा वाढण्याचाच संभव जास्त. महागाई कमी करण्याच्या निश्चित योजना अंदाजपत्रकांत नाहींत. सरकारची आर्थिक पत भरभक्कम आहे, सरकार खाजगी धंद्यांना, भांडवलाला व साहसाला पूर्ण आश्रय देणार, कोणावरहि कर-वाढ नाहीं, गेल्या बजेटांतील कांहीं अनिष्ट कर-योजनांचा फेरविचार होईल, सध्यां परिस्थिति बिकट आहे पण ती तात्पुरती. मजुरांचें सहकार्य व उत्पादनावर भर यामुळें लवकरच पुन्हा सुस्थिति निर्माण होईल असा कणखर आशावाद अर्थमंत्र्यांनीं प्रकट केला आहे. त्याचें प्रत्यंतर लवकर येईलच.

---

**सावंतवाडी संस्थानांत ग्राम पंचायती**—संस्थानांतील खेडेगांवांची सुधारणा करण्यासाठी सावंतवाडी संस्थानच्या अधिपतींनीं १॥ लाख रुपयांची रकम मंजूर केली आहे. खेडेगांवांतून ग्राम पंचायती स्थापन करणें आणि वैद्यकीय मदत देणें ह्या दोन कार्यांसाठी वरील रकमेचा विनियोग करण्यांत येणार आहे.

## रेल्वेचे दर वाढले

स्वतंत्र हिंदी सरकारचें पहिलें रेल्वे अंदाजपत्रक १५ ऑगस्ट १९४७ ते ३१ मार्च १९४८ ह्या मुदतीचें असून त्यांत वहातुकीच्या उत्पन्नाचा अंदाज १०७ कोटी रुपये धरण्यांत आला आहे. अर्थात, हा अंदाज चालू दरावरच आधारलेला आहे. उतारूंची वहातुक अपेक्षेपेक्षा अधिक होत आहे आणि फाळणीमुळें लष्करी वहातुकीची त्यांत भर पडत आहे. म्हणून, उतारूंच्या भाड्याचें उत्पन्न मूळ अंदाजापेक्षा ज्यास्त येईल. परंतु, रेल्वेजना कमी भाडें देणारे कोळसा, धान्य, इत्यादि जिन्नस मोठ्या प्रमाणावर वहावे लागत असल्यामुळें ह्या सदराखालील उत्पन्न घटत आहे. किरकोळ उत्पन्नाच्या सदरापासून १ कोटि, २४ लक्ष रुपये मिळतील अशी अपेक्षा आहे. खर्चाची बाजू पाहिली, तर व्यवस्थेचा खर्च १०७ कोटि, १८ लक्ष रुपये येईल व व्याजाखातीं १३ कोटि, ४४ लक्ष रुपये खर्ची पडतील. अशा रीतीनें उत्पन्न-खर्चांत १२ कोटि, ३८ लक्ष रुपयांची तूट पडत आहे.

| | उत्पन्न ( रु. ) | | खर्च ( रु. ): |
|---|---|---|---|
| वहातुक | १०७ कोटी, | व्यवस्था | १०७ कोटी, १८ लक्ष |
| किरकोळ | १ कोटी, २४ लक्ष | व्याज | १३ कोटी, ४४ लक्ष |
| | १०८ कोटी, २४ लक्ष | | १२० कोटी, ६२ लक्ष |
| तूट | १२ कोटी, ३८ लक्ष | | |
| | १२० कोटी, ६२ लक्ष | | १२० कोटी, ६२ लक्ष |

रेल्वे नोकरांना ३१ मार्च १९४८ पर्यंतच्या मुदतींत द्यावयाच्या भत्त्यांत २२½ कोटी रुपयांची वाढ होणार आहे. कोळशाची किंमत वाढल्याकारणानें त्याच्यासाठी करावा लागणारा खर्चहि २ कोटींनीं वाढत आहे. उत्पन्न-खर्चातील तूट भरून काढण्यासाठी रेल्वेवरील उतारूंच्या व मालाच्या वहातुक दरांत वाढ सुचविण्यांत आली आहे त्यामुळें ९ कोटि, १५ लक्ष रुपये जास्त जमा होऊन तुटीचा आकडा उतरून तो ३ कोटि, १९ लक्ष रुपयांवर येईल अशी अपेक्षा आहे. प्रवासाची लांबी जशी मोठी, तसा दर मैली आकार कमी, हें आजवरचें तत्त्व आतां सोडून देण्यांत आलें असून एकूण मैलांस दरमैली आकारानें गुणूनच तिकिटाची किंमत ह्यापुढें ठरविली जाईल. कांहीं रल्वेजवर मेल व एक्सप्रेस गाड्यांच्या प्रवासाचीं तिकिटें पॅसेंजर गाड्यांच्या तिकिटांपेक्षा महाग असतात; ही पद्धत सर्वच रेल्वेजवर आतां सुरू करण्यांत यावयाची आहे. मालाच्या वहातुकीचे दरहि दुरुस्त करण्यांत येत आहेत. ह्यासंबंधांत तपशीलवार पहाणी करण्यासाठी एप्रिल १९४५ मध्यें प्रारंभ झाला, तें काम अद्याप संपलें नसलें तरी त्यासाठी आतां थांबून बसतां येणार नाहीं हें उघड आहे. रेल्वेजच्या अंदाजपत्रकांतील तुटीमुळें, १९४७-४८ साठी अंदाजलेले ७½ कोटि रुपये मध्यवर्ती सरकारास आतां मिळणार नाहींत. त्याचप्रमाणें, बेटरमेंट फंडांतहि भर पडणार नाहीं. रेल्वे रिझर्व्ह फंड वाढणार तर नाहींच; उलट त्यांतूनच ३½ कोटि रुपये काढून घ्यावे लागणार आहेत. घसाराफंडाची हीच गत आहे. अंदाजपत्रकांत तीन नव्या रेल्वे लाइनींसाठी १½ कोटींची तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणें, मध्यप्रांत, संयुक्तप्रांत, मद्रास, ओरिसा व बिहार प्रांत स्थापन व्हावयाच्या संयुक्त रोड-रेल कंपन्यांत गुंतविण्यासाठी ६९½ लक्ष रुपये राखून ठेवलेले आहेत.

उतारूंच्या दरांत वाढ करावी लागत आहे, परंतु ती करतांना तिसऱ्या वर्गाच्या उतारूंवर, विशेषतः पॅसेंजर गाड्यांनीं जाणाऱ्या लहान लहान प्रवास करणाऱ्या उतारूंवर, त्याचा बोजा बसूं नये, अशी काळजी घेण्यांत येत आहे. १९३९ चा निदर्शक आकडा १०० धरला, तर १९४७-४८ मध्यें व्यवस्थेचा खर्च २४१ झाला, पगाराची रक्कम ३३२ झाली आणि कोळशावरील खर्च ३५३ वर गेला. परंतु, भाड्यांत मात्र अशी वाढ न करतां भागूं शकलें, ह्याचें कारण वहातुकींत झालेली वाढ हें होय. परंतु आतां सुचविण्यांत आलेल्या चढ्या दरांनींहि रेल्वेजच्या उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी होऊं शकत नाहीं. बिगर-तिकीट प्रवासावर नियंत्रण घातलें, तर सुमारें ८ कोटी रुपयांनीं रेल्वेजचें निवळ उत्पन्न वाढेल, अशी अपेक्षा आहे.

रेल्वेच्या दरांतील वाढ १ जानेवारी पासून अंमलांत येईल. तिचेमुळें मार्च, १९४८ अखेर ९ कोटि १५ लक्ष रु. जादा मिळतील, परंतु पुऱ्या बारा महिन्यांत हाच आकडा ३२ कोटी, ३२ लक्ष रुपयांवर जाईल. खालील तक्त्यांत त्याचा तपशील दिला आहे.

(आकडे कोटी रुपयांचे)

| | सबंध वर्ष | बजेटाची उरलेली मुदत |
|---|---|---|
| (१)उतारू | २२·२७ | ६·२२ |
| (२)गुड्स (कोळसा, लोखंड-पोलाद, धान्य, कापड इ. वगळून) | ८·३५ | २·४३ |
| (३)कोळसा | १·१० | ·३२ |
| (४)लोखंड पोलाद | ·६० | ·१८ |
| | ३२·३२ | ९·१५ |

उत्पन्नांत पडलेल्या नव्या भरीमुळें १९४८–४९ अखेरच्या पुऱ्या वर्षांत ४ कोटी रुपयांचा वाढावा दिसेल अशी अपेक्षा आहे. काटकसर आणि बिगर-तिकिटाच्या प्रवासांचे नियंत्रण ह्यांचेपासून बरेंच उत्पन्न वाढेल, तें वरील हिशेबांत धरलेलें नाहीं. बिगर-तिकिटाच्या उतारूंचा प्रश्न रेल्वे अधिकाऱ्यांच्या आवाक्याबाहेर चालला असून, ‘ शांतता आणि सुरक्षितता ’ ह्या सदराखालीं तो मोडूं लागलेला आहे. डॉ. जॉन मथाई ह्यांनीं ह्या बाबतींत संयुक्त प्रांत सर्वांत अधिक गुन्हेगार आहे असें सांगितलें. १९४७–४८ च्या रेल्वे अंदाजपत्रकावर सरकारच्या दीर्घकालीन धोरणाची छाप दिसून येत नाहीं; तोंड मिळवणी करण्यापुरतेंच त्याचें स्वरूप आहे. परंतु, १९४८–४९ च्या अंदाजपत्रकाचे वेळीं रेल्वे मंत्र्यांच्या भाषणांत पुष्कळच महत्त्वाचे मुद्दे आपणांस आढळतील अशी अपेक्षा आहे.

## “ आवश्यक झालें, तर ब्रिटन–जर्मनी रशियासहि भिडेल”

### मि. वॅलेस यांचे उद्गार

अमेरिका ज्या पद्धतीनें आपल्या सामर्थ्याचा आज उपयोग करीत आहे, ती लक्षांत घेतां १५ वर्षांत अमेरिकेस रशियाशी, ग्रेट ब्रिटनशीं व जर्मनीशी लढण्याची पाळी येईल, असा अमेरिकेचे माजी उपाध्यक्ष, मि. हेन्री वॅलेस ह्यांनीं इशारा दिला आहे. ग्रेट ब्रिटन व जर्मनी ह्यांचे हितसंबंध रशियाशी मिळतें घेतल्यानें साधत असतील, तर अशी मैत्री जुळणें अगदी शक्य आहे, असें ते म्हणाले. दारूगोळ्यांच्या अमेरिकन कारखानदारांना जागतिक सत्तेचा अभिलाष आहे व प्रगतिप्रिय धोरणास त्यांचा विरोध आहे; परंतु अमेरिकेची सामान्य जनता शांतताप्रियच आहे, असेंहि त्यांनीं सांगितलें.

## नियंत्रणें व आपलें आर्थिक जीवन

लेखकः—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए.

अन्नधान्य इ. वस्तूंवरील नियंत्रणें रद्द करावीं कीं चालू ठेवावीं हा प्रश्न अगदीं अलिकडे आपल्या राजकारणांत निर्माण झाला आहे ही एका दृष्टीनें आजच्या नाजुक परिस्थितींत दुःखाची गोष्ट आहे. वास्तविक १५ ऑगस्ट नंतरच्या कालांत निर्वासितांचा प्रश्न, शांतता राखण्याचा प्रश्न, जुनागड, हैद्राबाद, काश्मीर इ. संस्थानांचा प्रश्न, आंतर-राष्ट्रीय व्यापारी धोरणाचा प्रश्न, पाकिस्तानशीं योग्य स्वरूपाचे आर्थिक संबंध ठेवण्याचा प्रश्न (पाकिस्तानने कच्च्या तागाच्या निर्यातीवर जकात बसवून आर्थिक कररभंग केला अशी ताजी बातमी आहे.) इ. अनेक प्रश्न आपणापुढें असतांना नियंत्रणें रद्द करण्याच्या प्रश्नाचा विचार करण्याचें कांहींच प्रयोजन नव्हतें.

नियंत्रणांचा प्रश्न हा तत्त्वतः आर्थिक स्वरूपाचा आहे व त्याच दृष्टीकोनांतून त्याचा विचार झाला पाहिजे. महात्माजींचे विचार व अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटींत व्यक्त झालेली विचारसरणी यामुळें नियंत्रणें रद्द केलीं जावीं असें दडपण हिंद सरकारवर आलेलें असावें. फूड ग्रेन पॉलिसी कमिटीनेंहि पुढील एका वर्षांत नियंत्रणें हळु हळु रद्द करावी असें सुचविलें आहे. कदाचित् सदरहू कमिटींत भांडवलवाल्यांच्या दृष्टिकोनाचें वर्चस्व असावें. ह्या सगळ्या घटनांचा परिणाम असा झाला आहे कीं हिंद सरकार नियंत्रणें लवकरच रद्द करावीं ह्या विचारानें भारून गेलेलें दिसतें.

परंतु कमॉडिटी प्राइसेस बोर्डाचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे ही एक चांगली गोष्ट आहे. सदरहू बोर्डानें थोडक्यांत व निश्चित शब्दांत असें सुचविलें आहे कीं नियंत्रणें रद्द तर करतां कामा नयेतच, परंतु त्यांच्या अंमलबजावणीमध्यें जास्त चोखपणा व कार्यक्षमता निर्माण केली पाहिजे. नियंत्रणें रद्द केलीं तर सर्व ठिकाणीं गंभीर अनर्थकारक परिस्थिति निर्माण होईल असाहि इशारा सदरहू बोर्डानें दिला आहे. नियंत्रणें चालूं राहावीं व तीं जास्ती कार्यक्षम रीतीनें अंमलांत यावीं याचीं मुख्य कारणें म्हणजे धान्य, कापड, कोळसा, लोखंड, पोलाद इ. कोणत्याहि प्रकारचें उत्पादन १९५० पर्यंत वाढणें संभवनीय दिसत नाहीं. ही परिस्थिति हिंदुस्थानांतच राहाणार आहे, असें नाहीं, तर महायुद्धानें उध्वस्त झालेल्या इतर सर्व देशांतहि राहाणार आहे. यामुळें वस्तूंचा पुरवठा अगदीं मर्यादित किंवा अपुरा राहणें संभवनीय दिसत असतां, नियंत्रणें चालूच ठेवलीं पाहिजेत. वस्तूंचे वाढते बाजारभाव हा चलनविस्ताराचा आतां परिणाम नसून, अपुऱ्या पुरवठ्यामुळें व काळ्या बाजारांत जास्त भाव येण्याच्या शक्यतेमुळें झालेला परिणाम आहे. या बाबतींत रिझर्व्ह बँकेच्या गेल्या वार्षिक अहवालांतहि सावधगिरिचा इशारा देण्यांत आला आहे. कमॉडिटी प्राइसेस बोर्डाचा अहवाल लिहिला गेल्याची तारीख १७ एप्रिल आहे. ह्या नंतरच्या कालांत तर पारीस्थिति इतकी गंभीर झाली आहे कीं बोर्डाच्या सूचना सरकारनें विशेष काळजीपूर्वक विचारांत घेणें आवश्यक आहे, व तसा विचार करून नंतर भावनियंत्रणाबद्दलचें धोरण त्यानें ठरवावें. त्या प्रश्नाचा विचार करतांना भावनात्मक दृष्टिकोन किंवा भांडवलदारांची विचारसरणी लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. कमॉडिटी प्राइसेस बोर्डाचा अहवाल एका दृष्टीनें अगदी योग्य वेळीं प्रसिद्ध होत आहे, व त्यामुळें नियंत्रणांबद्दलचें योग्य मार्गदर्शन हिंद सरकारला होणार आहे.

परदेशांतून येणाऱ्या मालावरील नियंत्रणें ही डॉलरटंचाई व स्टर्लिंग बॅलन्समधून उपलब्ध होणाऱ्या पैशावर अवलंबून आहेत. राष्ट्रीय दृष्ट्या आपल्या आर्थिक जीवनाला पोषक होतील अशीच नियंत्रणें सरकारनें ठेवलीं पाहिजेत. परंतु येथें उल्लेखिलेल्या दोन कारणांमुळें ह्या नियंत्रणांना आणखी मर्यादा बसणें अपरिहार्य आहे. त्या नियंत्रणांचा बरा वाईट परिणाम पक्क्या मालाच्या अंतर्गत उत्पादनावर झाल्याशिवाय रहात नाहीं. ( योग्य वेळीं यंत्रसामुग्री न मिळाल्यास पक्क्या मालाचें उत्पादन घटतें, किंवा उत्पादनांत भर घालणाऱ्या संभाव्य योजना हातीं घेतां येत नाहींत. ) परंतु इतर अंतर्गत उत्पादनाची परिस्थिती निराळी आहे. सांप्रत कांहीं ठिकाणीं काळा बाजार, नफ्याची बेसुमार शक्यता इ. गोष्टींमुळें उत्पादनांत घट होते असें एक म्हणणें आहे. नियंत्रणें रद्द केल्यास अशा तऱ्हेची परिस्थिती जास्तच प्रमाणांत निर्माण होणें शक्य आहे. कांहीं वस्तूंवरील नियंत्रणें उठविल्यामुळें त्या वस्तू सर्वसाधारण लोकांस उपलब्ध होतात असा अनुभव तर मुळींच नाहीं. डाळी व गूळ या बाबतींत तर याच्या उलट अनुभव आहे. नियंत्रणें रद्द करावयाचीं झालींच तर वस्तूंचा योग्य पुरवठा व योग्य भावांत ती सरसकट उपलब्ध होणें या दोन गोष्टींकडे सरकारनें प्रथम लक्ष दिलें पाहिजे. एका वस्तूच्या बाबतींत नियंत्रण उठविण्याचा चांगला अनुभव आला तरच हळू हळू इतर वस्तूंवरील नियंत्रणें उठविण्याचा विचार करावा. प्रथम सरकारनें प्रयोगदाखल एका वस्तूवरील नियंत्रणरद्दी यशस्वी झाली आहे असें पटवून द्यावें, तरच सामान्य जनतेला थोडाबहुत विश्वास वाटेल.

कमॉडिटी प्राइसेस बोर्डानें आणखी एक महत्वपूर्ण इशारा दिला आहे. नियंत्रणें उठविलीं असतां आधींच वाढलेले बाजारभाव आणखी द्रुतगतीनें वाढतील, त्यामुळें कांहीं थोड्यांचा फायदा झाला तरी बहुजन समाजाच्या हाल अपेष्टा वाढतील व परिणामीं भाव इतके वाढतील कीं आणखी कांहीं काळानें मंदी आली कीं भरमसाट वाढलेल्या बाजारभावामुळें सर्वच आर्थिक जीवन कोलमडून खालीं पडेल व ती परिस्थिति सर्वांना सरसकटच अनर्थकारक ठरेल. ही गोष्टहि सरकारनें विचारांत घ्यावी.

भावनियंत्रण व वाटप पद्धति ह्या युद्धपरिस्थितीमुळें निर्माण झालेल्या आर्थिक रोगांतून निर्माण झाल्या आहेत. तेव्हां आर्थिक परिस्थिति नेहमींच्या पातळीवर येईपर्यंत नियंत्रणें रद्द करणें अनर्थकारक ठरेल. भावनियंत्रण व वांटप पद्धति यामुळें मध्यमवर्गीय हजारो तरुणांना एक उपजीविकेचें साधन निर्माण झालें आहे. वाटप पद्धति व नियंत्रणें रद्द केल्यास बेकारी उत्पन्न होईल. परंतु हा विचार जरी बाजूला ठेवला ( कारण केव्हां तरी नियंत्रणें रद्द होतीलच ) तरी आपली उत्पादनाची परिस्थिती आमूलाग्र विचारांत घेतां व गेल्या तीन चार महिन्यांतील परिस्थिति लक्षांत घेतां, नियंत्रणें जास्त कार्यक्षम करण्यांत यावीं असें वाटतें.

---


**मीठ तयार करण्याचा धंदा**—हिंदुस्थान मिठाच्या पुरवठ्याबाबत स्वयंपूर्ण व्हावा म्हणून उपायोजना सुचविण्यासाठी हिंदुस्थान सरकारनें १९४६ च्या जूनमध्यें एक तज्ज्ञ नेमला होता. आतां हिंदुस्थानांतील मिठाचें उत्पादन, वापर, वाटणी, दर्जा, आयात आणि किंमती, ह्या सर्व बाबींचा साकल्यानें विचार करण्यांत येत आहे. हिंदुस्थानांतील मिठाच्या उत्पादनाचीं आगरें आणि त्यांचें संभाव्य उत्पादन ह्यांचा विचार करण्यासाठी एक कमिटी स्थापण्यांत येणार आहे. ही कमिटी मिठाचें उत्पादन वाढविण्याच्या तावडतोबीच्या व दुरगामी अशा दोन्ही योजनांचा विचार करणार आहे.


## वस्तूंचे भाव आणि नियंत्रण

हिंदी वसाहतीच्या मध्यवर्ती सरकारनें नेमलेल्या कमॉडिटी प्राइसेस बोर्डानें जरुरीच्या वस्तूंचें उत्पादन व नियंत्रण ह्यासंबंधी जमविलेली माहिती नुकतीच उपलब्ध झाली आहे. बोर्डानें सरकारला सादर केलेल्या पत्रकावर १९ एप्रिल, १९४७ ही तारीख असली तरी त्या तारखेपासून आजपर्यंत अन्नधान्य व कापडासारख्या वस्तूंबाबत परिस्थिति सुधारलेली नाहीं. अर्थातच बोर्डानें ह्यासंबंधी प्रदर्शित केलेले विचार आज गैरलागू ठरण्याची भीति नाहीं. अन्नधान्याच्या निर्मितीसंबंधी बोर्डानें असें म्हटलें आहे कीं, येत्या तीन वर्षांत तरी हिंदुस्थानांतील शेतीच्या उत्पादनांत वाढ होण्याची फारशी शक्यता नाहीं. औद्योगिक मालाच्या उत्पादनाचीहि अशीच स्थिति आहे. युद्धकालापेक्षाहि आज ह्या मालाचें उत्पादन घटलें असून कोळशाचा अपुरा पुरवठा हें त्याचें प्रमुख कारण आहे. भांडवली माल परदेशांतून येण्यावर औद्योगिक उत्पादन वाढणें अवलंबून आहे. हिंदी सरकार जवळील अन्नधान्याचा सांठाही कमी झालेला आहे. परदेशांतून अन्नधान्याचा शिलकी पुरवठा भरपूर होण्यास १९५० साल उजाडेल असा अंदाज आहे. अर्थातच नजीकच्या काळांत सध्याचें १२ औंसांचें शिध्याचें प्रमाण चालूं ठेवून पुढील दोन वर्षांत सांठा करणें येवढेंच सरकारला करतां येण्यासारखें आहे. कापडाचा दरडोई पुरवठाही १९४७ व ४८ सालांत तरी युद्धपूर्व कालांतल्यापेक्षाही कमीच रहाण्याचा संभव आहे. गूळ आणि साखर ह्यांचा पुरवठा १९४८ साल अखेर तरी मर्यादित राहील. जळणाचे लाकूड, लोणारी कोळसा, लोखंड व पोलाद ह्यांचा पुरवठाही येत्या कांहीं वर्षांत मर्यादित रहाणार असल्यानें टंचाई असलेल्या सर्वच वस्तूंचें नियंत्रित वांटप करावें लागेल असा बोर्डाचा अभिप्राय आहे. शेतीच्या मालाच्या घाऊक किंमतींत आणि रहाणीच्या निर्देशांकांत जी वाढ झाली आहे त्याचें कारण पगारांत व वेतनांत झालेली वाढ हें होय असें मत बोर्डानें व्यक्त केलें आहे. अशा स्थितींत नियंत्रणें रद्द केल्यास गरजेच्या वस्तूंच्या किंमती वाढण्याची भीति बोर्डानें नमूद केली आहे; त्याच बरोबर नियंत्रणें ठेवण्याचा उद्देश नियंत्रणं रद्द केल्यानें साधण्यासारखा असल्यास नियंत्रणें ठेवण्याची गरज नाहीं असें आपलें मत दिलें आहे. नियंत्रणें ठेवण्याचे मुख्य उद्देश तीन आहेत:— (१) नियंत्रित भावानें किमान गरजेच्या वस्तूंचें वांटप होणें, (२) पदार्थांच्या किंमती स्थिर ठेवण्यास मदत करणें आणि (३) उत्पादनाची निदान सध्याची पातळी कायम ठेवणें. हे उद्देश नियंत्रणानें साध्य होत असतील तर नियंत्रणें रद्द न करतां, तीं अधिक कार्यक्षम करण्याचा उपाय सुचविण्यांत आला आहे.

## निराश्रितांच्या प्रश्नाचें स्वरूप

हिंदुस्थानची फाळणी झाल्यावर दोन्ही वसाहत सरकारांपुढें निराश्रितांची सोय लावण्याचा प्रश्न आकस्मिक रीत्या उभा राहिला आहे. केवळ हिंदी वसाहतीच्या दृष्टीनें विचार केला तरी सुद्धा ६० ते ८० लाख हिंदू शीख आश्रयार्थींची सोय सरकारला करावयाची आहे. आर्थिक परिस्थिति मामुली असती तरी सुद्धा वरील प्रश्न अवघड होऊन बसला असता. त्यांतून आज हिंदुस्थानांतील आर्थिक परिस्थिति फारच बिकट झालेली आहे. देशांत जरूरीच्या वस्तूंचा पुरवठा फार कमी आहे; औद्योगिक उत्पादनांत घट झाली आहे; रेल्वे वहातूक विस्कळीत झालेली आहे; पगार, वेतनें आणि किंमती पाठशिवणीचा खेळ खेळत आहेत. ह्या परिस्थितींत आर्थिक पुनर्घटनेच्या दूरगामी योजना तावडतोब उपयोगी पडणार नाहींत. त्यासाठीं उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी मामुली आर्थिक प्रवृत्तींना वाव देणेंच योग्य होईल. टाटा क्वार्टर्लीच्या ताज्या अंकांतील अग्रलेखानें ह्या प्रश्नाकडे वरीलप्रमाणें प्रामुख्यानें लक्ष वेधलें आहे.






## शेअर बाजार

( श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम्. )

सत्तावीस नोव्हेंबरला, श्री. षण्मुखम् चेट्टी यांनी अंदाजपत्रक सादर केल्यानंतर, टाटा डिफर्ड शंभर रुपये गाळ्यानें उघडून १८०५ ला बंद झाला व शुक्रवारीं पुन्हा वाढून १८७७८ ला बंद झाला. यावरून बाजारानें अंदाजपत्रकाचें किती उत्साहानें स्वागत केलें आहे याची कल्पना येईल. खऱ्या तेजीची भावना आज दीड वर्षानंतर प्रथमच दिसून आली. श्री. ए. डी. व के. आर. पी. श्रॉफ यांनीं अंदाजपत्रकाबद्दल विशेष अनुकूल उद्गार काढले असून खाजगी भांडवल व उद्योगाधिपती यांना यामुळें निःसंशय समाधान वाटेल असे उद्गार काढले. विशेषतः अर्थमंत्र्यांनीं पुढील नाणें-खर्ड्याच्या वेळेला मागील अंदाजपत्रकांत लियाकतअल्लींनीं बसविलेल्या करांचा फेरविचार करण्याचें आश्वासन दिलें याबद्दल त्यांनीं खास समाधानोद्गार काढले आहेत. या दृष्टीनें चालू अंदाजपत्रकानें बाजारांत नव्या तेजीचा पाया घातला आहे असें मानण्यास हरकत नाहीं. एकदां बाजाराची भावना पालटली म्हणजे अनुकूल कारणें शोधून काढून तेजी करण्याची प्रवृत्ति बळावते. सध्या नियंत्रणें दूर करण्याचा प्रश्न धसास लागलेला आहे. परवां सर परशुरामभाऊ कॉलेजमध्यें झालेल्या खाजगी चर्चेंत डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनीं सूचित केल्याप्रमाणें, आतां महात्मा गांधींनीच नियंत्रणें उठविण्याबाबत सरकारच्या मागें झक लावल्यानें त्याला विरोध करण्याची कुणाची प्राज्ञा नाहीं. मग नियंत्रण उठविण्यानें भयंकर किंमती वाढण्यांत परिणाम झाला तरी चालेल. अर्थात् किंमती वाढणारच आणि व्यापाऱ्यांची व सर्व कारखानदारांची पुन्हा एकदा पोळी पिकणारच. मोठाल्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देणारे आतां सरकारांत असल्याने पोलादाच्या किंमती वाढवून मिळण्यास हरकत असूं नये. ती वाढ लवकरच यावी व पुन्हा एकदा बाजाराला जोर यावा. आमच्या दृष्टीने मागील सहा महिने बाजार भीतीने मळाटून बसले होते ते आतां योग्य गुणदर्शक पातळीवर यावेत. म्हणजे अंदाज करावयाचाच तर डिफर्ड २२०० पर्यंत चढण्यास हरकत नाहीं. मात्र याला कालावधि लागेलच. समजा कांहीं उलट झालें तर तो १७००–१७५० च्या खालीं निदान जाऊं नये.

### दि डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्सचा रौप्य महोत्सव

वरील संस्थेचा रौप्य महोत्सव गेल्या रविवार तारीख ३० नोव्हेंबर रोजीं मुंबई प्रांताचे अर्थमंत्री श्री. वैकुंठराय मेहता यांचे अध्यक्षतेखालीं पार पडला. प्रथम ईशस्तवनानंतर संस्थेच्या स्थापनेपासून ( १९१८ ) आजपर्यंतची माहिति सांगितलेनंतर, संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनीं श्री. ग. कृ. भोपटकर यांनीं कसकसे प्रयत्न केले हें सांगितलें. यामध्यें श्री. घुपकर, देशपांडे डी. डी. व शिक्षणक्षेत्रांतील अधिकारी वर्गाचीं भाषणें झालीं. श्री. ग. कृ. भोपटकर यांच्या चित्राचें अनावरण करून, त्यांना मानपत्र अध्यक्षांच्या हस्तें अर्पण केलें. रौप्य महोत्सवाचे निमित्तानें एप्रिल १९४६ मध्यें हायस्कूल सुरू करून वरील संस्थेंत भर घातली. संस्थापक भोपटकर यांनीं, आपलें भाषण विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव इंग्रजीमध्यें केलें. या वेळीं सुमारें दोन हजारावर देणगी देणारांचीं नांवें जाहीर केलीं.

अध्यक्ष श्री. मेहता यांनीं मुंबई प्रांतांतील अशा संस्थांची माहिती सांगून, वरील संस्थेच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढून आपलें भाषण संपविलें. ( भाषण इंग्रजींत केलें. ) समारंभास पुण्यांतील व खास निमंत्रणावरून बाहेरगांवाहूनही प्रतिष्ठित नागरिक आले होते, तसेच कांहीं संदेशही आले होते.

शेवटीं वंदे मातरम् होऊन समारंभ खलास झाला.

( प्रतिनिधी )

## पंजाबमधील नुकसानीची भरपाई

### "राष्ट्रीय आपत्ती"बाबत विमा कंपन्यांचा दावा

ज्या विमा कंपन्यांच्या मुख्य कचेऱ्या अथवा शाखा कचेऱ्या पंजाबमध्यें होत्या, अशा कंपन्यांची एक असोसिएशन पंडित संतानम ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दिल्ली येथें स्थापन झाली आहे. "निर्वासित" कंपन्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करणें, हा तिचा उद्देश आहे. पंजाबमध्यें नुकसानीची भरपाई करण्यास ह्या कंपन्या कायद्यानें बांधलेल्या आहेत किंवा काय, ह्यासंबंधीं असोसिएशन कायदेपंडितांचें मत घेत आहे. कायदा आणि सुव्यवस्था ह्यांचे अभावामुळें आलेलें नुकसान ही राष्ट्रीय आपत्ती समजून तिला राष्ट्रच जबाबदार आहे, अशा अर्थाचें आपलें म्हणणें असोसिएशननें सरकारपुढें मांडलें आहे. जनरल इन्शुअरन्स कंपन्यांकडे आलेले क्लेम पहाता, ते सर्व सुरळीत पार पाडणें त्यांस शक्य होणार नाहीं, असें दिसतें. परंतु आयुर्विमा कंपन्यांकडे मूळ कल्पनेपेक्षां फारच थोडे क्लेम्स दाखल झालेले आहेत. परंतु, त्यावरहि क्लेम देण्याची जबाबदारी पडतच नाहीं, असें असोसिएशनचें म्हणणें आहे. कित्येक कंपन्यांनीं आपल्या नोंदलेल्या कचेऱ्या १५ ऑगस्टपूर्वी पंजाबच्या बाहेर हालविल्या तरी त्यांचे रेकॉर्ड, सामान, मालमत्ता, हीं अद्याप मार्गेच राहिली आहेत. हा प्रश्नहि असोसिएशन सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. ३१ मार्च, १९४८ नंतर हिंदी कंपन्यांचा पाकिस्तानांत दर्जा काय रहाणार, ह्याविषयींहि साशंकता वाटत आहे. पाकिस्तानी कंपन्यांस प्रोत्साहन देण्यासाठी हिंदी कंपन्यांवर जबर अटी लादल्या जातील काय? हिंदी व पाकिस्तान सरकारनें ह्याबाबत १५ ऑगस्टपूर्वीचीच परिस्थिति कायम ठेवणें इष्ट होईल, परंतु पाकिस्तान सरकार त्यास मान्यता देईल काय, असा प्रश्न आहे.

### लाचलुचपत थांबविण्यासाठी लॉटरीचा अवलंब

पश्चिम बंगालच्या वाट्यास येणारें लोखंड-पोलाद मागणीचे मानानें फारच अपुरें पडत आहे. तेव्हां त्याची वाटणी करण्यांत लाचलुचपतीस वाव मिळतो तो राहूं नये, ह्यासाठी चिठ्या टाकून वाटप करण्याचें धोरण तेथील प्रांतिक सरकारनें अवलंबिलें आहे.

### नव्या भांडवल उभारणींत औद्योगिक व बिगर-औद्योगिक उभारणीचें प्रमाण

| | १-७-१९४१ ते ३०-९-१९४५ | १-१०-१९४५ ते ३१-३-१९४७ |
|---|---|---|
| औद्योगिक | ६१·२६ | ६०·२५ |
| बिगर–औद्योगिक | ३८·७४ | ३९·७५ |
| एकूण | १००·०० | १००·०० |


## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:–९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. –एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.– ब्रँच सेक्रेटरी

### शेअर्सची दर्शनी किंमत

पूर्वीच्या हिंदी कंपन्यांचे भाग भारी किंमतीचे असत. इंपीरिअल बँकेच्या भागाची दर्शनी किंमत अजूनहि ५०० रु. आहे. त्याचप्रमाणें कित्येक गिरण्यांचे शेअर्सहि भारी दर्शनी किंमतीचे आहेत. कालांतरानें, २५० रु. किंवा १०० रु. किंमतीचे शेअर्स निघूं लागले. टाटा स्टीलनें आपल्या शेअर्सच्या किंमती ७५ रु. (५ पौंड), १५० रु. (१० पौंड) व ३० रु. (२ पौंड) अशा ठेवल्या. आतां १० रुपयेवाले शेअर्स काढण्याची प्रथा पडली आहे, आणि कित्येक शेअर्स त्याहूनहि लहान आहेत. परंतु असे शेअर्स काढणाऱ्यां कंपन्या एकेकास ५० किंवा १०० पेक्षा कमी शेअर्स विकतच नाहींत किंवा त्यांची वर्गवारी नोंदीतच नाहींत. म्हणजे, ५० किंवा १०० च्या गटानेंच त्यांचा व्यवहार होतो.

### इन्कम टॅक्स चौकशीसाठीं कमिशन

प्राप्तीवरील कराबाबत सर्व प्रश्नांची चौकशी करण्यासाठी व पुढें कर चुकवाचुकवीचीं कांहीं विशिष्ट प्रकरणें तपासण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें सर एस. वरदाचारिअर (फेडरल कोर्टाचे माजी न्यायाधीश) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं एक कमिशन नेमलें आहे. मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश श्री. राजाध्यक्ष व मुंबईच्या इन्कम टॅक्स अपेलेट ट्रिब्यूनलचे सभासद श्री. मुजुमदार हे दोघेहि कमिशनर्स आहेत.

### नऊ विदेशी बँकांच्या जपानमध्यें शाखा

खालील नऊ विदेशी बँकांना जपानमध्यें शाखा उघडण्यासाठी लायसेन्स देण्यांत आलें आहेः—(१) बँक ऑफ इंडोचायना, (२) हाँगकाँग अँड शांघाय बाँकिंग कॉर्पोरेशन, (३) चार्टर्ड बँक ऑफ इंडिया, (४) नेदरलंडस ट्रेडिंग सोसायटी, (५) नेदरलंडस इंडिया कमार्शिअल बँक (६) बँक ऑफ चायना, (७) बँक ऑफ अमेरिका, (८) नॅशनल सिटी बँक ऑफ न्यूयॉर्क, (९) चेस नॅशनल बँक ऑफ न्यूयॉर्क.

### रशियाची चवथी पंचवार्षिक योजना

रशियाची चवथी पंचवार्षिक योजना १९५० अखेर पुरी व्हावयाचें ठरलें असलें तरी ती १९४९ अखेर पुरी करण्याची शपथ लेनिनग्राड येथील कामगारांनीं घेतली आहे.


### रामदास बोटीचा विमा

इंडियन को. नॅव्हिगेशन अँड ट्रेडिंग कंपनीची रामदास बोट बुडाली, तिचा १२,२२,५७३ रुपयांस विमा उतरलेला होता.

### हिंदी कंपन्या पाकिस्तानांत विदेशी बनल्या

पाकिस्तानांत मुख्य कचेरी असलेल्या कंपन्या हिंदुस्थानांत "विदेशी" बनल्या असून हिंदुस्थानांत मुख्य कचेरी असलेल्या कंपन्या पाकिस्तानांत "विदेशी" झाल्या आहेत. फाळणीचा हा कायदेशीर परिणाम अपरिहार्य आहे, असें श्री. न. वि. गाडगीळ ह्यांनीं मध्यवर्ती विधिमंडळांत सांगितलें.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८



'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार



-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २










हें पत्र पुणें, पेठ मांगुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.